Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

परीक्षा प्राधान्य/महत्वाचे

क्र.रा.मं./परीक्षा-२/२९८९
पुणे-४११००४
दिनांक- ३०/०७/२०२४

प्रति,

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
सर्व विभागीय मंडळे.

विषय - माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा जुलै-ऑगस्ट २०२४ चे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापनाचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरणेबाबत...

संदर्भ - १.या कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं./गणकयंत्र/०१/१७८ दि.१५/१/२०२४
२. या कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं./ परीक्षा-२/२७००,दि.०५/०७/२०२४

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा जुलै-ऑगस्ट २०२४ परीक्षेसाठी गणकयंत्र विभागामार्फत सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना online पध्दतीने प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व तत्सम परीक्षा मूल्यमापनाचे गुण login मधून भरण्याची सुविधा देण्यात आलेली आहे.

जुलै-ऑगस्ट २०२४ मधील इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन इ. परीक्षेचे गुण ऑनलाईन पध्दतीने दिनांक १६/०७/२०२४ ते ३०/०७/२०२४ या कालावधीमध्ये नोंदवून ऑनलाईन पध्दतीने दि. ०१/०८/२०२४ रोजी मंडळाकडे जमा करणेबाबत संदर्भीय पत्र क्र.२अन्वये कळविण्यात आले होते.

तथापि अद्याप काही माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडून प्रात्यक्षिक, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन, श्रेणी इ. परीक्षेचे गुण मंडळाचे संकेत स्थळावर नोंदविण्यात आले नसल्याने, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेचे प्रात्यक्षिक, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन, श्रेणी इ. परीक्षेचे गुण दि.०३ ऑगस्ट २०२४ पर्यंत नोंदविण्याबाबत मुदतवाढ देण्यात येत आहे.

दि.०३/०८/२०२४ पर्यंत परीक्षेचे गुण नोंदवून ऑनलाईन पध्दतीने मंडळाकडे जमा करावयाचे आहेत. तसेच दि.०५/०८/२०२४ रोजी प्राचार्य/मुख्याध्यापक यांचा शिक्का व स्वाक्षरीसह गुणतक्ते विहित कार्यपध्दतीचा अवलंब करून विभागीय मंडळात जमा करावयाचे आहेत.

सदर बाब आपल्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी व संदर्भीय पत्रासोबतच्या कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्याबाबत विभागीय मंडळ स्तरावरून सूचित करावे.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४

क्र. कोविमं/१०वी /१२वी/गोप./प्रात्य./तोंडी/ ९४३९
दिनांक : ३१/०७/२०२४

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व शाळा,कनिष्ठ महाविद्यालये
सातारा, सांगली, कोल्हापूर.

उपरोक्त परिपत्रकातील सूचनांनुसार माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) जूलै-ऑगस्ट २०२४ परीक्षेचे प्रात्यक्षिक व अंतर्गत मूल्यमापन तथा श्रेणी ऑनलाईन भरणेबाबत परिपत्रकाप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी.

(सुभाष रा. चौगुले )
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर